# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### ढोकी (जि.उस्मानाबाद) येथील ट्रकचालकाची लॉकडाऊनच्या काळात अत्यावश्यक सेवेचा माल घेऊन जात असताना हत्या झाल्याबाबत

**(१) ४५२१ (१४-०९-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकी येथील ट्रक चालक काशीराम धोंडीराम कदम हे लातूर येथून अत्यावश्यक सेवेच्या मालाची डिलिव्हरी करण्यासाठी लॉकडाऊन काळात पुण्याकडे घेऊन जात असताना काही चोरट्यांनी कुरकुंभ औद्योगिक वसाहतीजवळ दिनांक २९ मार्च, २०२० च्या रात्री त्यांच्या छातीत वार केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब असल्यामुळे त्यांच्या घरचा कर्ता माणूस गेल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांची अवस्था अत्यंत हलाखीची झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना लॉकडाऊनच्या काळात सेवा देत असताना वरील ट्रक चालक यांचा चोरट्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यामुळे शासन त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत व्यक्तीच्या

नातेवाईकांना आर्थिक मदत मिळणेकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०८-०४-२०२२) :** (१) होय हे खरे आहे,ट्रक चालकाचे काशीराम रामभाऊ कदम हे मूळ नांव आहे.
(२) हो खरे आहे.
(३) व (४) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद कार्यालयाकडून मयत व्यक्तींच्या कुटूंबियांना राष्ट्रीय कुटुंब लाभ अर्थसहाय्य मिळणेसाठी अहवाल सादर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षण विभागातील पदोन्नती रखडल्याने शिक्षण विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ८७६१ (१५-०६-२०२१) श्री.कपिल पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षण विभागातील पदोन्नती प्रलंबित असल्याने शिक्षण विभागात विविध स्तरावर आयुक्त ते शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक, शिक्षण उपनिरीक्षक, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण अधीक्षक, वेतन अधीक्षक, लिपिक आणि शिपाई यांची पदे रिक्त **असून प्रभारी कार्यभारावर कामकाज सुरु** असल्यामुळे वेतन काढणे, वैद्यकीय देयके व इतर सर्व प्रशासकीय कामांमध्ये विलंब होत असल्याने त्याचा त्रास विद्यार्थी, पालक, संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत पदोन्नतीची शिक्षण विस्तार अधिकारी-११, केंद्र प्रमुख-१५, उच्चश्रेणी मुख्याध्यापक-१५ व विषय पदवीधर शिक्षकांची-१०० पेक्षा अधिक पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकूण मंजूर पदांपैकी एकूण किती पदे प्रभारी कार्यभारावर

रिक्त आहेत, तसेच, कोणत्या स्तरावर किती पदे रिक्त आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०५-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे. रिक्त पदे भरण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागासवर्ग व भटक्या विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(३) ९०२० (१६-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागासवर्ग व भटक्या विमुक्त प्रवर्गातील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गत दोन वर्षापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेची घोषणा करण्यात आली असून उक्त शिष्यवृत्ती ही योजना केंद्र शासन व राज्य शासनामार्फत राबविली जात असून देखील उक्त प्रवर्गातील विद्यार्थी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिष्यवृत्तीच्या घोषणेस दोन वर्षे इतका कालावधी उलटूनही पहिल्याच वर्षाची शिष्यवृत्ती अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत अडीच लाख वार्षिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांना दीड हजार तर भटक्या व विमुक्त जातींमधील विद्यार्थ्यांना एक हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी केंद्र शासनाच्या हिश्याची रक्कम राज्य शासनाकडे प्राप्त झाली असून राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम शासनाने न दिल्याने राज्यातील विद्यार्थी हे शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे दिनांक २३ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम मिळण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाला यापूर्वी सादर केला असून त्याप्रकरणी वित्त विभागाकडून अद्यापही निर्णय झाला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने गत दोन वर्षापासून थकीत असलेली शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्यास पात्र असूनही वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी, तसेच वित्त विभागाकडून अहवालाबाबत निर्णय व्हावा, यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाची निर्मिती दिनांक ९/०३/२०१७ रोजी झाली. या विभागांतर्गत (अ) इ.१ ली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र हिस्सा ५० % व राज्य हिस्सा ५० %) केंद्र) योजना दिनांक २७/०५/२०१९ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. या योजनेसंदर्भात केंद्राकडून प्राप्त निधी, तरतूद व खर्च खालीलप्रमाणे आहे :-

(रुपये हजारात)

| अ.क्र. | वर्ष | | अर्थसंकल्पीय तरतूद | केंद्राकडून प्राप्त निधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २ | २०१९-२० | केंद्र हिस्सा २२२२ F१७४ | २०३००० | ० | ० |
| | | राज्य हिस्सा २२२५ F१८३ | २०३००० | | ० |
| ३ | २०२०-२१ | केंद्र हिस्सा २२२२ F१७४ | २१३८९२ | ० | २१३८९२ |
| | | राज्य हिस्सा २२२५F१८३ | १०३००० | | १०२९९९ |
| ४ | २०२१-२२ | केंद्र हिस्सा २२२२ F१७४ | १५०००० | ० | ० |
| | | राज्य हिस्सा २२२५ F१८३ | ५०००० | | २५००० |

या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये रुपये ९२१.०० लक्ष व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये रुपये १२१७.९२ लक्ष असा एकूण रुपये २१३८.९२ लक्ष इतका निधी सामाजिक न्याय विभागास प्राप्त झाला होता.सदर योजना सामाजिक न्याय विभागाकडून राबविण्यात आली नसल्याने व नवीन विभागामुळे लेखाशीर्ष उपलब्ध नसल्याने तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेल्या लॉकडाऊन मुळे उपरोक्त केंद्र हिस्सा रुपये २१३८.९२ लक्ष व राज्य हिस्सा रुपये १०२९.०० लक्ष इतका निधी सन २०२०-२१ मध्ये व रुपये २५०.०० लक्ष सन २०२१-२२ मध्ये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित रुपये ८५८.९३ राज्य हिस्सा वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे.

(ब) इ.१ ली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (DNT) विद्यार्थ्यांना भारत सरकारची डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र हिस्सा ७५% व राज्य हिस्सा २५%) दिनांक २७/०५/२०१९ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्राप्त तरतूद व खर्च खालीलप्रमाणे आहे:-

(रुपये हजारात)

| अ.क्र. | वर्ष | | अर्थसंकल्पीय तरतूद | केंद्राकडून प्राप्त निधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | केंद्र हिस्सा २२२२ F१९२ | २२४१०० | ० | ० |
| | | राज्य हिस्सा २२२५ F२०९ | १४९४० | - | ० |
| २ | २०२०-२१ | केंद्र हिस्सा २२२२ F१९२ | ४५००० | ० | ० |
| | | राज्य हिस्सा २२२५ F२०९ | १५००० | - | ० |
| ३ | २०२१-२२ | केंद्र हिस्सा २२२२ F१९२ | ४५००० | ० | *४५००० |
| | | राज्य हिस्सा २२२५ F२०९ | १५००० | - | *१५००० |

* सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये अनुक्रमे रुपये १.५० कोटी, रुपये ३.७८ कोटी व रुपये २.२४ कोटी असा एकूण रुपये ७.५२ कोटी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असून तो राज्याच्या एकत्रित निधी मध्ये जमा होता.त्यापैकी रुपये ४.५० कोटी इतका केंद्र हिस्सा निधी व रुपये १.५० कोटी इतका निधी राज्य हिस्सा म्हणून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीतून वितरीत करण्यात आला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

इतर मागास वर्गाच्या भारत सरकार मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पालकांचे अडीच लाख उत्पन्न असणाऱ्या अनिवासी विद्यार्थ्यांना १० महिन्यांकरीता रुपये १०००/- व अनिवासी इयत्ता ३ वी ते १० मधील विद्यार्थ्यांना रुपये ५०००/- शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

तर विमुक्त जाती व भटक्या जमाती (DNT) विद्यार्थ्यांना भारत सरकारची डॉ. आंबेडकर मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पालकांचे दोन लाख उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना १० महिन्यांकरीता १०००/- व इयत्ता ९ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांना रुपये १५००/- इतकी शिष्यवृत्तीची तरतूद आहे.

(४), (५) व (६) प्रश्न भाग १ च्या उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार इतर मागास वर्गाच्या इ. १ ली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये प्राप्त झालेल्या केंद्र हिश्याच्या प्रमाणात राज्य हिश्श्याची रक्कम रुपये २१३८.९२ लक्ष पैकी रुपये १०२९.०० लक्ष इतका निधी सन २०२०-२१ मध्ये व रुपये २५०.०० लक्ष इतका निधी सन २०२१-२२ मधील अर्थसंकल्पिय तरतूदीतून वित्त विभागाच्या मान्यतेने वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित रुपये ८५८.९३ लक्ष राज्य हिस्सा वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे.

तर भारत सरकारच्या डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती (DNT) विद्यार्थ्यांकरीता रुपये १५० लक्ष इतका राज्य हिस्सा म्हणून वितरीत करण्यात आला आहे.

---

## राज्यातील नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत

**(४) ९६६६ (२०-०७-२०२१) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, केव्हापासून, तसेच, शैक्षणिक धोरणाच्या ठळक बाबी काय आहेत,

(२) असल्यास, अद्याप शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-०४-२०२२) :** (१) राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरवात करण्यात आली आहे. सदर धोरणांतर्गत अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आयुक्त, शिक्षण यांच्या स्तरावरुन

विषयनिहाय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच नवीन शैक्षणिक धोरणातील ज्या बाबींची तातडीने अंमलबजावणी करणे शक्य आहे, अशा बाबींची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. उदा. एकात्मिक व द्विभाषिक पाठयपुस्तके विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देणे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील विविध तरतुदी विचारात घेऊन मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली चिंतन गट (Think Tank) निर्माण केला आहे. त्याअंतर्गत विषयनिहाय कार्यबल गट स्थापित करण्यात आले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० वर आधारीत राज्याचे पुढील चार वर्षांचे सन २०२४ पर्यंतचे व्हीजन निर्धारित करण्यात आले असून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,२०२० अंतर्गत Foundational Literacy and Numeracy कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी सुरु असून त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे आणि निर्देश शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहेत. त्यामध्ये अभ्यासक्रम पुनर्रचना, २१ व्या शतकातील कौशल्यांवर आधारीत पाठ्यपुस्तक सुधारणा, एकात्मिक व द्विभाषिक पुस्तकांची निर्मिती, आदर्श शाळा, शिक्षक सक्षमीकरण, व्यावसायिक शिक्षण इत्यादीचा त्यात समावेश आहे.

शैक्षणिक तंत्रज्ञान विषयक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान फोरम निर्माण करण्यात आला आहे. तसेच शैक्षणिक तंत्रज्ञान विषयक बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली E-governance कक्ष स्थापित करण्यात आला आहे. या कक्षामार्फत विभागाचा संपूर्ण डेटाबेस तयार करण्यात आला आहे. SCERT मार्फत शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत त्यामध्ये गुगल क्लासरूम, Virtual classroom. दीक्षा APP, WhatsApp based मूल्यमापन करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील व धाणेगांव (ता.अंजनगावसूर्जी, जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांना चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(५) १०२२४ (०६-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाणेगांव (ता.अंजनगाव सूर्जी, जि.अमरावती) तसेच राज्यात माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या चक्रीवादळामुळे घरांसह संत्रा पिकांचे मोठे नुकसान झाले असून त्याचे प्रशासनाकडून सर्वेक्षण आणि पंचनामे करून वर्षभराचा कालावधी उलटूनही अद्‌याप शेतकऱ्यांना मदत मिळाली नसल्याची बाब माहे एप्रिल २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाणेगांव (ता.अंजनगाव सूर्जी, जि.अमरावती) येथील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चक्रीवादळामुळे शेती व घरांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना संत्रा पिकांच्या व घराच्या झालेल्या नुकसानीची मदत तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे भिंगारा, (ता.जळगाव (जामोद), जि.बुलढाणा) या गावातील भिल्ल व पावरा या प्रवर्गातील जमातीना अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व दाखला देण्याबाबत

**(६) १०२६३ (१६-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भिंगारा (ता.जळगाव (जामोद), जि.बुलढाणा) या गावात अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र दाखला नसल्यामुळे एक ही अर्ज ग्रामपंचायत निवडणुक २०२१ मध्ये दाखल करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावात भिल्ल व पावरा या जमातीच्या प्रवर्गाचे नागरिक असतानाही अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र स्वातंत्र प्राप्तीनंतर ही मिळू शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून आदिवासींसाठी असलेल्या योजनांचा लाभ भिल्ल व पावरा जमातींना दिला जातो तसेच आश्रमशाळेत ही या जमातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असताना उच्च शिक्षणासाठी अनुसूचित जमातींच्या (एस.टी.) राखीव व प्रवर्गातून अर्ज करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एकाच जमातील शासनाकडून अनुसूचित जमातींच्या (एस.टी.) राखीव प्रवर्गातून नोकरी, उच्च शिक्षण आणि ग्रामपंचायत निवडणुक आदी प्रवर्गात दुजाभाव होत असून ७० वर्षापासून या गावातील नागरिकांना शासन योजनांचा लाभ देत असताना जातीचे प्रमाणपत्र, दाखले मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मौजे भिंगारा ता.जळगाव (जामोद) सह जिल्ह्यातील भिल्ल व पावरा या जमातींना अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र / दाखला व अन्य सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०८-०४-२०२२) :** (१) नाही.
(२), (३), (४) व (५) राज्यात महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम, २००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे काम करण्यात

येते. नियम, २००३ मधील नियम ३ नुसार सादर केलेल्या अर्जावर योग्य चौकशी करुन प्रकरणाच्या गुणावगुणांवरुन व गृहचौकशी अहवालाच्या आधारे अनुसूचित जमातीचे दाखले देण्यात येतात. जर अनुसूचित जमातीची व्यक्ती नियमांत नमूद एक किंवा अधिक कागदपत्र सादर करु शकत नसेल अशा प्रकरणी उक्त नियमांतील नियम ३ (४) मधील तरतूदीनुसार अशी व्यक्ती त्याबाबतची कारणे शपथपत्रात नमूद करेल व त्याआधारे आवश्यक चौकशी केल्यानंतर सक्षम प्राधिकारी त्याच्या अर्जावर गुणांवगुणानुसार निर्णय घेईल अशी तरतूद आहे. उक्त अधिनियम, नियमांतील तरतूदी या सर्व अनुसूचित जमातींना लागू आहेत. त्यानुसार अनुसूचित जमातीचे दाखले देण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २०२१०/२०१७ सिव्हील अपिल क्रमांक ११२३४-४८/२०१७ दिलीप विठ्ठल बांबळे व इतर विरुध्द दिलीपकुमार मोतीराम तोतलोड व इतर याप्रकरणी दिनांक ०६/०९/२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीसाठी राखीव जागेवर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदर नियम सर्व अनुसूचित जमाती प्रवर्गांना लागू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खरपुडी (खु.), (ता.खेड, जि.पुणे) येथील देवस्थानावर प्रशासक नेमण्याबाबत

**(७) ११८२६ (३०-०३-२०२२) श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरपुडी (खु.), (ता.खेड, जि.पुणे) येथील खंडोबा देवस्थान ट्रस्टवर नेमलेल्या विश्वस्तांची मुदत ७ महिन्यापूर्वी संपल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन विश्वस्त नेमण्यासाठी निवडणूक घ्यावी व निवडणूक होईपर्यंत ट्रस्टवर प्रशासक नेमावा अशी मागणी ग्रामस्थांनी धर्मादाय आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२५-०४-२०२२) :** (१) हे खरे नाही. न्यासाची योजना क्र. १९/२०१९ ला दिनांक २१/०१/२०२० रोजी दिलेल्या मंजुरीनुसार विश्वस्तांचा कालावधी तीन वर्षाचा आहे. त्यानुसार सध्याच्या विश्वस्तांचा कार्यकाल सन २०२३ पर्यंत आहे. म्हणजेच विश्वस्तांची मुदत संपलेली नाही.
(२)न्यासाच्या विश्वस्तांची मुदत संपलेली नाही.सदर न्यासावर प्रशासक नेमण्याबाबत धर्मादाय आयुक्तांकडे कोणताही अर्ज प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## पैठण ते औरंगाबाद या मुख्य शहरांना जोडणाऱ्या राज्य मार्गाच्या कामाबाबत..

**(८) ११९५२ (३०-०३-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ९५०६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण ते औरंगाबाद या दोन महत्वाच्या शहरांना आणि औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्राला पुरक ठरणाऱ्या राज्य मार्गाच्या चौपदरीकरण करण्याच्या कामाला शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाला मंजूरी दिलेल्या कामाचे स्वरुप काय आहे व काम सुरु होऊन पूर्ण होण्याचा कालावधी किती आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२२-०४-२०२२) :** (१) व (२) पैठण ते औरंगाबाद हा रस्ता दिनांक ०३/०१/२०१७ च्या अधिसूचनेव्दारे राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२-ई म्हणून घोषित झाला आहे.

सद्य:स्थितीत सदर रस्त्याच्या ४७ कि. मी. लांबीमध्ये चौपदरीकरण करण्यासाठी DPR तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून भू-संपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. भूसंपादन झाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या मंत्रालय तसेच इतर कार्यालयातून निवृत्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा शासन सेवेत मुदतवाढ देण्यात आल्याबाबत

**(९) ११९५३ (३०-०३-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मंत्रालय तसेच इतर कार्यालयातील शासकीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने पुन्हा सेवेत मुदतवाढ दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन सेवेत सेवानिवृत्तीनंतर पुन्हा मुदतवाढ दिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत एकूण संख्या किती आहे,

(३) तसेच सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना पुन्हा शासन सेवेत घेण्याबाबतची सविस्तर कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२२-०४-२०२२) :** (१) हे खरे नाही.

शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक १७/१२/२०१६ व दिनांक २१/०२/२०१८ रोजी घेतला आहे.

प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालये आवश्यकतेनुसार विषयनिहाय एमपॅनलमेंट तयार करुन त्यामध्ये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करतात.

सदर शासन निर्णयानुसार नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## सांगली जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानामधून निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप होत असल्याबाबत

**(१०) १२००८ (३०-०३-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात शिधापत्रिकेवर दिवाळीत देण्यात येणारी डाळ व साखर देणे बंद केले असून सद्य:स्थितीत देण्यात आलेला तांदूळसुध्दा निकृष्ट दर्जाचा असल्याचे दिनांक २६/१०/२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२९-०४-२०२२) :** (१) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सन २०२१ मधील दिवाळी मध्ये डाळीचे वाटप करण्यात आले नसून नियमित साखरे व्यतिरिक्त दिवाळी करीता साखरेचे वाटप करण्यात आलेले नाही. दिनांक ०१/०९/२०२१ रोजी ई-मेल द्वारे अन्नधान्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता त्या गावातील सदर रास्तभाव दुकानातून वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याचा दर्जा चांगल्या प्रतीचा असल्याबाबत त्या दुकानास जोडलेल्या ग्राहकांच्या तोंडी तसेच लेखी जबाबामध्ये त्यांनी नमुद केले असून अन्नधान्याच्या दर्जाबाबत त्यांची काहीही तक्रार नसल्याबाबत स्पष्ट केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळेगाव (जि.पुणे) येथील वीज महापारेषण, महावितरण, वीज कर्मचारी वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) १२०२४ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव (जि.पुणे) येथील वीज महापारेषण, महावितरण, वीज कर्मचारी वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या खड्डयामुळे रस्त्यावरुन पाण्याचा निचरा होत नसल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली असून स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२८-०४-२०२२) :** (१) सदर रस्ता हा तळेगांव नगर परिषदेच्या हददीत आहे.सदर रस्त्यावर ड्रेनेज लाईन व नवीन पाण्याची लाईन टाकण्याचे काम करण्यात आले त्यामुळे रस्त्यांची दुरावस्था झाली, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) नगरविकास विभागाने रस्त्याचे कामाकरीता रक्कम रुपये ४० लक्षाची मान्यता दिली आहे.या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यान्वये यंत्रणा असल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक २३/१२/२०२१ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अनुसूचित जमातीची जात वैधता प्रमाणपत्रे अवैध ठरविल्याने प्रकरणे न्यायलयात प्रलंबित असल्याबाबत

**(१२) १२५५५ (३०-०३-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जमातीची जात वैधता प्रमाणपत्रे संबंधित समितीने अवैध ठरविल्याने मोठ्या संख्येने सदर प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी,२०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा दरम्यान निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून अवैध ठरविलेली ५३९९ प्रकरणे मा.सर्वोच्च न्यायालयाने समितीकडे पुनर्विचार करण्यासाठी परत पाठविली आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने समितीकडे पुनर्विचाराकरीता परत पाठविलेली प्रकरणे पुन:श्च तपासून लवकर निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२२-०४-२०२२) :** (१) होय.

(२) माहे जानेवारी, २०२२ अखेर समिती कार्यालयाकडे मा.सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विचाराकरीता परत केलेली ४ प्रकरणे व मा.उच्च न्यायालयाने पुनर्विचाराकरीता परत केलेली एकूण ३२३९ प्रकरणे आहेत.

(३) मा.न्यायालयाने पुनर्विचाराकरीता समितीकडे परत पाठविलेल्या प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महानिर्मिती कंपनीच्या विविध जागांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत

**(१३) १२८६५ (३०-०३-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानिर्मिती कंपनीच्या विविध जागांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती ठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-०४-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महानिर्मिती कंपनीद्वारे कंपनीच्या मालकीच्या जागावर उभारण्यात येणारे सौर ऊर्जा प्रकल्प खालीलप्रमाणे आहेत :-

| प्रकल्पाचे ठिकाण | क्षमता (मेगावॅट) |
|---|---|
| कौडगाव, जि.उस्मानाबाद | ५० |
| सिंदाला, जि.लातूर | ६० |
| महानिर्मिती विद्युत केंद्राच्या उपलब्ध जागेवरील प्रकल्प | ५२ |
| शिवाजीनगर, साक्री-१, जि.धुळे | २५ |
| **एकूण** | **१८७** |
| वाशीम-१ (मौजे दुधखेडा-६० मेगावॅट, मौजे परडी ताकमोर-३० मेगावॅट, मौजे कंझारा-४० मेगावॅट) जि.वाशीम | १३० |
| वाशीम-२ (मौजे बाभूळगांव-२० मेगावॅट व मौजे सायखेडा-२० मेगावॅट) जि.वाशीम ४० | |
| मौजे कचराळा, जि.चंद्रपूर | १४५ |
| जि.यवतमाळ (मौजे मंगलादेवी-२५ मेगावॅट, मौजे पिंपरी इजारा-२५ मेगावॅट व मौजे मालखेड-२५ मेगावॅट) | ७५ |
| **एकूण** | **३९०** |
| दोंडाईचा, जि.धुळे-२५० मेगावॅट क्षमतेचा सौर पार्क प्रकल्प | २५० |

सदरील प्रकल्प उभारणी विविध टप्प्यात सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तीर्थपुरी शहागड (ता.घनसावंगी, जि.जालना) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(१४) १२८७६ (१०-०३-२०२२) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीर्थपुरी शहागड (ता.घनसावंगी, जि.जालना) स्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची तक्रार तेथील नागरिकांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२९-०४-२०२२) :** (१) सदर रस्त्याबाबतची बातमी विविध प्रसार माध्यमातुन दाखविण्यात आली होती.
(२) याबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे मार्फत चौकशी आदेशित करण्यात आली आहे.
चौकशी अहवाल प्राप्त झाला असून अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयात नविन शिधापत्रिकाधारकांना रास्त धान्य दुकानांवर धान्य मिळण्याबाबत

**(१५) १२९०१ (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात मागील वर्षभरात सुमारे १५०० नविन शिधापत्रिकाधारकांची विविध योजनेंतर्गत नोंदणी झाली असून शासनाकडून कोटा वाढत नसल्यामुळे शिधापत्रिकाधारकांना रास्त धान्य दुकानांवर धान्य मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून कोटा न वाढविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोटा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२९-०४-२०२२) :** (१) औरंगाबाद जिल्ह्यातील RCMS प्रणालीवरील लाभार्थ्यांची आकडेवारी विचारात घेऊन त्यापेक्षा जास्त प्रमाणात औरंगाबाद जिल्ह्यास दिनांक १८/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये वाढीव इष्टांक देण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याचे पहिले उपमुख्यमंत्री व दुसरे मुख्यमंत्री स्वातत्र्य संग्रामी राष्ट्रपुरुष दादासाहेब उर्फ मारोतराव कन्नमवार यांची जयंती व पुण्यतिथी शासनामार्फत साजरी करण्याबाबत

**(१६) १२९४२ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड, डॉ.रणजित पाटील, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे पहिले उपमुख्यमंत्री व नंतर मुख्यमंत्री असलेले दादासाहेब कन्नमवार यांची जयंती व पुण्यतिथी शासनामार्फत साजरी केली जात नसल्याचे माहे जानेवारी२०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत निर्णय घेवून दादासाहेब कन्नमवार यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२०-०४-२०२२) :** (१) व (२) दरवर्षी शासकीय निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरुष/ थोर व्यक्ती यांचे जयंती/ राष्ट्रीय दिन साजरे करावयाचे कार्यक्रम निश्चित करताना सद्य:स्थितीतील कार्यक्रम व नव्याने समाविष्ट करण्यासाठी प्राप्त झालेल्या विनंती/ मागण्या शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

शासकीय, निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरुष, थोर व्यक्ती यांचे जयंती/राष्ट्रीय दिन करावयाचे जयंती दिन साजरे करताना याआधी काढलेल्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्टामध्ये कर्मवीर मा.दादासाहेब कन्नमवार यांच्या नावाचा समावेश नव्हता.

सन २०२२ मध्ये साजरा करावयाच्या जयंत्या/ राष्ट्रीय दिन या अनुषंगाने प्राप्त झालेल्या मागण्यांसह प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्यात मा.दादासाहेब कन्नमवार यांच्या नावाचा समावेश होता. मात्र, सन २०२१ मध्ये ज्या जयंती/राष्ट्रीय दिन साजरे करण्यास परवानगी दिली होती त्याच प्रस्तावास सन २०२२ करिता मान्यता देण्यात आली व परिपत्रक निर्गमित करण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ. मोळ, मांजरवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील म्हस्कोबा डोंगर परिसरात टी.एन्ड विंड पॉवर कंपनीच्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या कामाबाबत

**(१७) १३००८ (३०-०३-२०२२) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. मोळ, मांजरवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील म्हस्कोबा डोंगर परिसरात टी.एन्ड विंड पॉवर कंपनीच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे कार्य माहे सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यादरम्यानपासून सुरु असून कंपनीने तत्संबंधीत कामासाठी कोणतीही शासकीय परवानगी घेतली नसल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने तेथील रस्त्याचे काम करतांना अनधिकृतरित्या गौणखनिजांचे उत्खनन करुन शासनास स्वामित्वधन (रॉयल्टी) अदा केले नसून ठेकेदारामार्फत रस्त्याच्या कामासाठी वापरात असलेली वाहनयंत्रणा व मशिनरीमुळे तेथील मंदीर परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे व कंपनीच्या अवजड वाहनांमुळे रस्त्यांची दुरवस्था होऊन घरे व शौचालये इत्यादींचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात मा.लोकप्रतिनिधीनी मा.तहसिलदार, खटाव (वडूज), मा.प्रांताधिकारी, दहिवली विभाग मा.पालकमंत्री, जिल्हा सातारा व मा.मुख्यमंत्री, निवेदने देऊन शासनाची परवानगी न घेणाऱ्या व महसुली उत्पन्नाचे स्वामित्व धन बुडविणाऱ्या संबंधित कंपनी ठेकेदार व व्यवस्थापनाविरोधात कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित ठेकेदार व कंपनी व्यवस्थापनाविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-०४-२०२२) :** (१) हे खरे नाही. मे.टी.एस.विंड पॉवर डेव्हलपर्स यांना मौजे मोळ, मांजरवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथे १५० मेगावॅट क्षमतेच्या सौर पार्कसाठी दिनांक २६/०३/२०२१ रोजी महापारेषण कंपनीने पारेषण जोडणीकरीता मान्यता दिली आहे.

सदर कंपनीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४४-अ च्या पोट कलम (२) नुसार जमिनीचा बिनशेती वापर सुरु केल्याबाबत जिल्हाधिकारी, सातारा तसेच तहसिलदार, खटाव यांना कळवून प्रकल्पाचे काम सुरु केले आहे.

(२) मौजे मोळ, मांजरवाडी मस्कोबा परिसरात मे.टी.एस.विंड पॉवर यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाच्या कामांतर्गत गौण खनिज उत्खननाबाबत तहसिलदार, खटाव यांचे दिनांक ०१/११/२०२१ च्या आदेशानुसार रुपये ९७३४०/- रक्कम चलनाद्वारे शासनास भरणा केली आहे.

तसेच ठेकेदारामार्फत रस्त्याच्या कामासाठी वापरात असलेली वाहन यंत्रणा व मशिनरीमुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याचे वा कंपनीच्या अवजड वाहनामुळे रस्त्याची दुरावस्था तसेच शौचालये व घराचे नुकसान झाल्याचे स्थळ पाहणीत आढळून आले नाही.

(३) होय.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार करण्याबाबत

**(१८) १३०४८ (२९-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतराष्ट्रीय विमातळाच्या विस्ताराबाबतचा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तार रखडण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमानतळाच्या विस्तार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२८-०४-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर विमानतळाची निविदा प्रक्रिया रद्द केल्याच्या विरुद्दध जी.एम.आर.एअरपोर्ट लि.यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.१७२३/२०२० यामध्ये दिनांक १८/०८/२०२१ ला आदेश पारीत झाला असून, सदर आदेशाविरुध्द १) नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली २) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण,नवी दिल्ली. ३) महाराष्ट्र शासन, मुंबई ४) मिहान इंडीया लि., नागपूर यांनी प्रत्येकी स्वतंत्ररित्या विशेष याचिका (SLP) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) वरीलप्रमाणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खरीप हंगामातील धानाची खरेदी आधारभूत किंमतीनुसार करण्याबाबत

**(१९) १३३६६ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, डॉ.रणजित पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामातील धानाची खरेदी आधारभूत किंमतीनुसार करण्यासाठी शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीस पुन्हा सात दिवसांची मुदतवाढ दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धानाच्या भरडाईची व्यवस्था, साठवणुकीसाठी गोदामांची व्यवस्था वेळेत न होऊ शकल्यामुळे काही जिल्ह्यात खरेदी मुदतीआधी थांबवावी लागली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अद्यापपर्यंत किती शेतकरी धान खरेदीपासून वंचित राहिले आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०६-०५-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे शेड्युलिंग करण्यात आले असून, शेड्युलिंग नुसार खरेदी केंद्रावर आणलेला शेतकऱ्यांचा संपूर्ण धान खरेदी करण्यात आला आहे. त्यानुसार उक्त हंगामात दोन्ही अभिकर्ता संस्था (Markfed + TDC) मिळून ४,७०,६५७ शेतकऱ्यांकडील एकूण १३३५७८३२.१४ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## हिंगोली जिल्ह्यातील गावांत पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(२०) १३४५६ (३०-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावांत पाणीपुरवठा योजना राबविण्यात आलेली नसल्याचे माहे डिसेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलजीवन मिशनच्या आराखड्यात ३५८ गावे आल्याने या गावांत सदर योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील उर्वरित गावांच्या नळयोजनांची तातडीने अंदाजपत्रके तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०६-०४-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उर्वरित गावांच्या नळ योजनांची तातडीने अंदाजपत्रके तयार करण्यासाठी शासन स्तरावरून WAPCOS तांत्रिक सल्लागार संस्थेची नेमणूक करण्यात आलेली असून, संबंधित संस्था व जिल्हा परिषदेकडील अभियंते यांचेमार्फत अंदाजपत्रके तातडीने तयार करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.